३८
८८.

अशासकीय विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून विलंब शुल्क आकारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग

शासन परिपत्रक, क्र. एसएसएन २२०१/[३४१/२००१]माशि-३.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ४ मे २००२

आवक दिनांक 20 JUN 2002
आवक क्रमांक ६६६८

संदर्भ :- १] महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्स[प्रोव्हीबिशन ऑफ कॅपिटेशन फी] ॲक्ट १९८७
२] शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन १९९७/३११/९७/माशि-३, दि. २२ जुलै १९९९.
३] शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन २००१/१२०/२००१माशि-३, दि. २२ जून २००१.
४] विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई विभाग, यांचे पत्र क्र. शिउसं/माध्य-४/२७१०, दि. २२ नोव्हेंबर २००१.

शासन परिपत्रक :-

अशासकिय विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील काही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून ब-याचवेळा विलंबाने शैक्षणिक शुल्क अदा केले जाते. त्यामुळे शिक्षकांचे वेतन व भत्त्यांची अदाई करणे व शाळांना अन्य खर्च भागविणे यासाठी शाळांना अडचणी येत आहेत. शैक्षणिक शुल्क विलंबाने अदा करण्याच्या कृतिस आळा घालणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काही शाळांकडून मनमानी दराने विलंब शुल्क आकारले जाते. विलंब शुल्क आकारण्यामध्ये सुसूत्रता असावी या दृष्टीकोनातून महाराष्ट्र ॲन्टी कॅपिटेशन फी ॲक्ट १९८७ मधील कलम ४.३ [आय] मधील तरतुदींच्या अनुषंगाने शासन खालील अटींच्या अधीन राहून विलंब शुल्क आकरण्यास परवानगी देत आहे :-

कार्यबल गटाने मान्य केलेले शैक्षणिक शुल्क, सत्र पध्दतीने या मासिक वा वार्षिक तत्त्वावर आकारलेले कोणतेही शुल्क विहित केलेल्या दिनांकापूर्वी विद्यार्थ्याने भरणे आवश्यक राहील. जर या विहित दिनांकानंतरही १० दिवसापर्यंत संबंधित विद्यार्थ्याने शुल्क अदा केले नाही तर, त्यानंतर जेव्हा ते शुल्क शाळेकडे जमा करण्यात येईल त्या कालावधीसाठी प्रत्येक दिवशी रुपये १/- याप्रमाणे विलंब शुल्क संस्थेला आकारता येईल. संबंधीत विद्यार्थी विलंब शुल्क क्षमापित करण्यासाठी शाळा व्यवस्थापनाकडे विनंती अर्ज करु शकेल व शाळा व्यवस्थापन आपल्या स्तरावर त्याचा योग्य तो निर्णय घेईल. विलंब शुल्कापोटी जमा करण्यात आलेली रक्कम शाळेच्या विकास निधीमध्ये जमा करण्यात यावी प्रत्येक शाळेने शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी विहित केलेला दिनांक शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कळवावा त्याचप्रमाणे प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सदर बाब पालकांच्या नजरेस आणून द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहि

क्र. शिनि/उ/आस्था/फी/ 5284
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, उत्तर विभाग
यांचे कार्यालय, चेंबूर, मुंबई - ७१.

दिनांक: 12 JUN 2002

उपरोक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाहीसाठी अग्रेषित.

Wankhade V.K.
शिक्षण निरीक्षक
बृहन्मुंबई, उत्तरविभाग

प्रति,

मुख्याध्यापक,

मान्यताप्राप्त अशासकिय विनाअनुदानित माध्यमिक शाळा
उत्तर विभाग.

प्रत: -

१] मा. शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई
यांना सविनय सादर

२] संबंधीत शिक्षण उपनिरीक्षक
एफ / साऊथ /एफ/ नॉर्थ, एल्. एम्. एन्. टी. वार्ड.

यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रति,
मुख्याध्यापक,
माध्यमिक/उच्चमाध्यमिक

विषय :- अशासकिय विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून विलंब शुल्क आकारण्याबाबत.

संदर्भ :- जा. क्र.ठाजिप/शिक्षण /का.क्र. ९ /५२२ माध्यमिक शिक्षण विभाग जि.प. ठाणे दि. १०. ०६. २००२.

अशासकिय विनाअनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांमधील काही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून बऱ्याचवेळा विलंबाने शैक्षणिक शुल्क अदा केले जाते. त्यामुळे शिक्षकांचे वेतन व भत्याची अदाई करणे व शाळांच्या अन्य खर्च भागविण्यासाठी या शाळांना अडचणी येत आहेत. शैक्षणिक शुल्क विलंबाने अदा करण्याच्या कृतिस आळा घालणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे काही शाळांकडून मनमानी दराने विलंब शुल्क आकारले जाते. विलंबशुल्क आकरण्यामध्ये सुसूत्रता असावी या दृष्टीने महाराष्ट्र ॲन्टी कॅपिटेशन फी ॲक्ट १९८७ मधील कलम ४-३ [आय] मधील तरतुदीच्या अनुषंगाने शासन खालील अटींच्या आधीन राहून विलंब शुल्क आकरण्यास परवानगी देत आहे.

कार्यबल गटाने मान्य केलेले शैक्षणिक शुल्क, सत्र पध्दतीने वा मासिक वा वार्षिक तत्वार आकारलेले कोणतेही शुल्क विहीत केलेल्या दिनांकापूर्वी विद्यार्थ्याने भरणे आवश्यक राहील. जर या विहीत दिनांकानंतरही १० दिवसांपर्यंत संबंधित विद्यार्थ्याने शुल्क अदा केले नाहीतर, त्यानंतर जेव्हा ते शुल्क शाळेकडे जमा करण्यात येईल त्या कालावधीसाठी प्रत्येक दिवशी रू.१/- प्रमाणे विलंब शुल्क संस्थेला आकारता येईल संबंधित विद्यार्थी विलंब शुल्क क्षमापित करण्यासाठी शाळाव्यवस्थापनाकडे विनंती अर्ज करू शकेल व शाळा व्यवस्थापन आपल्या स्तरावर त्याचा योग्य तो निर्णय घेईल. विलंब शुल्कापोटी जमा करण्यात आलेली रक्कम शाळेच्या विकासनिधीमध्ये जमा करण्यात यावी प्रत्येक शाळेने शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी विहीत केलेल्या दिनांक संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक, यांना कळवावा. त्याच प्रमाणे प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी सदरबाब पालकांच्या नजरेस आणून द्यावी.

गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, डहाणू.

नंबर बाहेर/ [illegible] /बाब/ ९६०
पंचायत समिती कार्यालय
डहाणू तारीख १३/७/०२